Literacy for a Billion

Movie: Aai Thor Tujhe Upkaar
Year: 1999

Song: Priye Lajvanti
Lyricist: Jagdish Khebudkar

प्रिये लाजवंती नको अंग चोरू
प्रिये लाजवंती नको अंग चोरू
घडी मिलनाची गुलाबी क्षणांची
घडी मिलनाची गुलाबी क्षणांची
नको हा सुगंधी उसासा भरू
हाय
प्रिया साजणा रे नको प्रीत चोरू
प्रिया साजणा रे नको प्रीत चोरू
घडी मिलनाची गुलाबी क्षणांची
घडी मिलनाची गुलाबी क्षणांची
वेड्या मनाला कशी सावरू
आ हा
प्रिये लाजवंती नको अंग चोरू

ही गोरी गोरी काया
हा सोन फुलांचा रंग
हे लोचन झाले तंग
किती निरखू तुला
चल जा
घे हाती माझा हात
दे घडीभराची साथ
चल जाऊ तराणे गात

माझ्या प्रीत फुला
घडी मिलनाची गुलाबी क्षणांची
घडी मिलनाची गुलाबी क्षणांची
नको हा सुगंधी उसासा भरू
हाय
प्रिया साजणा रे नको प्रीत चोरू

मी धुक्यात न्हाऊन आले
नवतीचे लेणे ल्याले
का भान हरपूनी गेले
प्रीत आली भरा
हाय हाय
हे तन मन माझे सारे
तुज अर्पण केले राजा
तू जन्म सोबती माझा
माझ्या प्राणेश्वरा
घडी मिलनाची गुलाबी क्षणांची
हो घडी मिलनाची गुलाबी क्षणांची
वेड्या मनाला कशी सावरू
आ हा
प्रिये लाजवंती नको अंग चोरू
प्रिया साजणा रे नको प्रीत चोरू

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*